[redacted]

स्थापत्य व विद्युत बेरोजगार
अभियंत्यांच्या कंत्राटदार
नोंदणीचे नुतनीकरण.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शा.नि.क्र. सीएटी १०९७/प्र.क्र.४२/इमारती २
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :-११ फेब्रुवारी, २००४.

**वाचावे** - १) शा.नि.क्र.सीएटी १०९०/सीआर २१/इमा.२, दि.२ फेब्रुवारी,१९९६
२) शा.नि.क्र.सीएटी १०९६/सीआर ३४८/इमा.२, दि.३ मार्च,१९९७
३) शा.नि.क्र.सीएटी १०९६/सीआर १७२/इमा.२, दि.२० एप्रिल,१९९८
४) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.४ मार्च,१९९९
५) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२३ जानेवारी, २००१.
६) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२९ जुलै २००२.
७) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२५ ऑक्टोबर २००२.
८) शा.नि.क्र.सीएटी १०९७/सीआर ४२/इमा.२, दि.२० ऑक्टोबर २००३.

**प्रस्तावना** - बेरोजगार स्थापत्य अभियंत्यांना कंत्राटदार म्हणून वर्ग ६ मध्ये आणि विद्युत अभियंत्यांना वर्ग ड मध्ये थेट नोंदणी देण्याबाबतचे आदेश संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आलेले आहेत. नोंदणीकृत बेरोजगार अभियंता व्यवसायात स्थिर होण्यासाठी त्यांना विनास्पर्धा काम वाटप करण्याचे आदेश निर्गमित केले असून, वेळोवेळी त्यामध्ये सुधारणाही करण्यात आलेल्या आहेत. बहुतांश बेरोजगार अभियंत्यांना शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या आर्थिक मर्यादेपर्यंतच्या पूर्ण रकमेची विनास्पर्धा कामे अद्याप न मिळाल्यामुळे बेरोजगार अभियंता यांना कंत्राटदार नोंदणीच्या नुतनीकरणासाठीच्या अटींची पूर्तता करणे कठीण होत असल्याने, शासनाने दिनांक २३/१/२००१ च्या समक्रमांकाच्या निर्णयान्वये डिसेंबर २००० अखेर बेरोजगार अभियंता या संवर्गात नोंदणी झालेल्या अभियंता कंत्राटदारांच्या नोंदणीचे नुतनीकरण पुढील ५ वर्षांसाठी विनाअट करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. बेरोजगार अभियंत्यांना विनास्पर्धा कामे देण्याची आर्थिक मर्यादा वाढवूनही नोंदणीकृत बेरोजगार अभियंता कंत्राटदारांची संख्या व त्यांचेसाठी उपलब्ध होणारी कामांची अल्प संख्या व त्या अनुषंगाने बेरोजगार अभियंता कंत्राटदार संघटना यांनी विनाअट नुतनीकरण मिळणेबाबत केलेली मागणी विचारात घेता, शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय** - १) बेरोजगार अभियंता कंत्राटदारास विनास्पर्धा कामे देण्याच्या आर्थिक मर्यादेत वाढ करणेत आली असली तरी, तसेच त्यांच्या नोंदणीचे पहिले नुतनीकरण विनाअट होऊन देखील काही बेरोजगार अभियंत्यांना त्यांच्यासाठी विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेच्या किंमतीची कामे मिळाली नसल्याने, पुढील कालावधीतसुध्दा त्यांच्या नोंदणीचे नुतनीकरण त्यांच्यासाठी विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेच्या किंमतीची कामे मिळेपर्यंत विनाअट करण्यात यावे. अशा विनाअट नोंदणी नुतनीकरणासाठी

पतदारी दाखला, हातातील कामे, केलेली मोठी कामे, सनदी लेखापालांकडून प्रमाणित लेखापरिक्षित ताळेबंद इ. नोंदणी/नुतनीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची आवश्यकता राहणार नाही, मात्र नोंदणी शुल्क भरणे अनिवार्य राहील.

२) दर वर्षी वाढणारी बेरोजगार अभियंत्यांची संख्या व त्यांना विनास्पर्धा वाटपासाठी उपलब्ध असलेली कामे यांचे व्यस्त प्रमाण पहाता, विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेच्या किंमतीपर्यंतची विनास्पर्धा कामे मिळण्यास दीर्घ कालावधी लागण्याची दाट शक्यता आहे. सबब विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेच्या किंमतीपर्यंतची विनास्पर्धा कामे केल्यानंतरही त्यापुढील नुतनीकरणाच्या वेळेस हातातील कामे, केलेली मोठी कामे, गेल्या ३ ते ५ वर्षातील आर्थिक उलाढाल इ. अटींची पूर्तता करणे बेरोजगार अभियंत्यांना शक्य होणार नाही. त्यामुळे विहीत केलेल्या आर्थिक मर्यादेच्या किंमतीपर्यंतची विनास्पर्धा कामे केल्यानंतर स्पर्धात्मक पध्दतीने कामे घेणे शक्य व्हावे यासाठी मागील ३ ते ५ वर्षांची आर्थिक उलाढाल, हातातील कामे, व केलेली मोठी कामे यासंबंधीच्या अटी शिथील करुन स्थापत्य/विद्युत बेरोजगार अभियंत्यांना अनुक्रमे वर्ग ६ /वर्ग ड मध्ये ३ वर्षांसाठी कंत्राटदार नोंदणी देण्यात यावी. या नोंदणीची मुदत संपल्यानंतर मात्र विहीत पध्दतीनेच नोंदणी करण्यात यावी.

हे आदेश विभागाचे आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव तसेच पाटबंधारे विभाग यांच्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( शि. वि. तामखडे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. उप मुख्यमंत्री, ह्यांचे प्रधान सचिव,
मा. मंत्री (पाटबंधारे), यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सा.बां.)/पाटबंधारे ह्यांचे खाजगी सचिव,
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर,
सचिव (रस्ते)/सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, ह्यांचे स्वीय सहाय्यक,
पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी,

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
सर्व अधिक्षक अभियंते, सा.बां.विभाग
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग